# मल्टिव्हर्स (अनेक-विश्व) पुणे

राजेंद्र कुमार काळे

भारत सरकारच्या आवासन व शहरी कार्य मंत्रालयाच्या स्वच्छ सर्वेक्षणने वर्ष २०२३ मध्ये जारी केलेल्या सिटी रिपोर्ट-कार्डनुसार, पुण्यातील निवासी भाग, नद्यां, आणि सार्वजनिक शौचालये "१००%" स्वच्छ आहेत. अहवालानुसार, पुणे महानगरपालिका "९९%" कचरा घराघरातून उचलते आणि बाजारपेठाही "९९%" स्वच्छ आहेत. संकलित कचऱ्यापैकी "९७%" कचरा उगमस्थानीच विभाजित केला जातो आणि "१००%" कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे, तांत्रिकदृष्ट्या, शहरात कुठेही कचरा दिसत नाही. थोडक्यात, आपलं पुणं आता नोर्वेतील ऑस्लो झालं आहे—मी पाहिलेला शेवटचा परदेशातील अत्यंत स्वच्छ नगर.

विज्ञानच्या मल्टिव्हर्स (अनेक-विश्व) थ्योरीतलं असंही एक पुणे शहर ब्रह्मांडात कुठेतरी आहे याचा मला खरंच आनंद आहे. याला आपण "रिपोर्ट-कार्ड पुणे" म्हणू या. मी राहतो ते वेगळं पुणे आहे: इथे स्वच्छ सर्वेक्षणचं रिपोर्ट कार्ड एक दूरचं स्वप्न आहे. आमचे फुटपाथ स्थानिक रहिवासी कचरा टाकण्यासाठी, तसंच प्रत्येक कोपऱ्यावर मंदिरे बांधण्यासाठी वापरतात. आम्ही दुचाकी वाहने फुटपाठवरच लावतो. याच फुटपाठांवर परवानाधारक स्थानिक गरीब, स्थलांतरित गरिबांना त्यांच्या टपऱ्या सौजन्याने भाड्याने देतात, बेरोजगार तरुण गप्पा मारतात, आणि भटके कुत्रे लघु/दीर्घशंकेचे समाधान करतात.

शनिमंदिराजवळ एक 'नैसर्गिक' नाला वाहतो, पण त्यात नवीन-जुन्या इमारातींतील सांडपाणीच जास्त असतं. आमच्या पुण्यात तेवीस नाले शहारातलं बरचसं सांडपाणी आमच्यायेथील मुळा-मुठा नद्यांत घेऊन जातात. चौकावर आधुनिक डिझाईनची सुंदर सार्वजनिक शौचालयं बांधली होती. त्यांत नाणी टाकावी लागत असे. आता ती बाहेरूनच लघु-शंका समाधाना करिता वापर-योग्य राहिली आहेत. आमचा भाग मॉडेल कॉलनी (मायबोलीत म्हणलं तर "आदर्श" कॉलनी) म्हणून ओळखल्या जातो. आमच्या जगातील पालिकेचे कमिश्नर साहेब सुद्धा इथेच राहतात, याचा आम्हाला अभिमान आहे.

मल्टिव्हर्स (अनेक-विश्व)च्या वैज्ञानिक सिद्धांतात एकाच विश्वात अनेक विश्व असल्याची सुद्धा नोंद आहे, ती बरोबर आहे. आमच्या पुण्यात देखील अनेक इतर पुणे आहेत. आमचा मुख्य रस्ता, गोखले रस्ता, दोन पुण्यांना विभागतो. रस्त्याच्या उत्तरेला सुनियोजित वसाहतीमध्ये संघटित कार्यक्षेत्रातून आलेले माझ्यासारखे मध्यम/उच्च-मध्यम-वर्गीय नागरिक राहतात. काही नामवंत उद्योगपतींचे बंगले सुद्धा आहेत. रस्त्याच्या दक्षिणेला असंघटित क्षेत्रातील नागरिकांची झोपडपट्टी आहे.

संघटित पुणेला "पुणे-स", आणि असंघटित पुणेला "पुणे-अ", अशी नावे देता येतील. तुमची गाडी तुमचा ड्रायवर चालवत असेल तर तुम्हाला झोपडपट्टीमधून जाता येणार नाही आणि असंघटित पुणे, "पुणे-अ", तुमच्या जीवनात (तेथील घर-कामगार तुमची धुणी-भांडी करत असली तरी) येणार नाही. मी बहुतेक सायकल वापरतो किंवा पायी चालतो, म्हणून हे दोन्ही पुणे माझ्या दैनंदिन जीवनाचे भाग आहेत. अजून काही पुणे मला माहीत आहेत. एक अदृश्य पुणे आहे—"कॉन्ट्रॅक्टर-पुणे". तेथील अदृश्य कॉन्ट्रॅक्टर मध्यरात्री त्यांचा राडारोडा आमच्या पुण्याच्या फुटपाथवर आणून टाकतात. ते कुठून येतात, कुठे जातात, कोणालाच माहीत नाही.

महानगरपालिकेच्या स्वच्छतेच्या जबाबदारीचे म्हंटले तर रेकॉर्डवर आमच्या सगळ्या पुण्याला एकच कायदा लागू आहे—महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९. आणि प्रत्यक्षात संघटित पुणे ("पुणे-स") सारखे थोडेफार नागरी प्रशासन झोपडपट्टीतील असंघटित पुणेला ("पुणे-अ")ला सुद्धा लाभवं, त्यांची सुद्धा प्रगती व्हावी, अशी देवाचरणी प्रार्थना वरील महानगरपालिका अधिनियम, १९४९मध्ये केलेली आहे. आणि झोपडपट्टीतील कचरा उचलण्यास स्वच्छ संस्थेच्या कामगार-सभासदांना प्रत्येकी रुपये २० ची 'स्वच्छ' संस्थेने जमा केलेले सबसीडी-क्लेमचे बिल फिरत-फिरत बाळंतपणा सारखे नऊ महीने वाट बघितली तर नक्कीच मिळते.

तेंव्हा असं म्हणता येणार नाही, कि आमच्या पुण्याची महानगरपालिका "पुणे-अ"ला आपल्या गळ्यातील काटा समजते, जो काढून टाकणं त्यांना कायद्याने शक्य होत नाही. ज्या पुण्यात कंत्राटदारांची बिले दोन दिवसांत पास

होतात, ते पुणे आमच्या पुण्यातीलच, पण महानगरपालिकेचं  लाडकं, एक वेगळं पुणे आहे: त्याला “कॉर्पोरेट-पुणे” म्हणतात. विज्ञानाने अजून मल्टिव्हर्स नाकारलेलं नाही, त्यामुळे आणखी कित्येक पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, नाशिक, इत्यादि  असण्याची शक्यता आहे. पाठकांनी त्यांच्या माहितीच्या मल्टिव्हर्स नगरांबाबत कळवावे.

स्वच्छ सर्वेक्षण रिपोर्ट कार्ड खोट्या वचनांची मोजणी करतं, की वास्तवाची? हा एक मोठा प्रश्न आहे, व जोपर्यंत या त्याचे उत्तर सापडत नाही, तोपर्यंत पुण्याचं प्रशासन श्रोडिंगरच्या मांजरासारखं राहील—एकाच वेळी स्वच्छ आणि अस्वच्छ, दोन्ही.

---

*राजेंद्र* रक्षा अनुसंधान व विकास संगठन*चा माजी शास्त्रज्ञ, वकील, आणि* द सेकुलर कम्यूनिटी *या जागतिक संस्थेचा अध्यक्ष आहे. त्याने सर्व-समावेशक विकासाच्या दृष्टीने* पुणे-सिक्टीन *नावाचा एक स्थानिक उपक्रम सुरू केला आहे.*



